नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com

अकोला, कृषी हवामान सल्ला — मंगळवार दिनांक – २७ ऑक्टोबर २०२०

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक २८ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | २८/१० | २९/१० | ३०/१० | ३१/१० | ०१/११ |
| पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३४.२ | ३३.७ | ३३.६ | ३४ | ३४.६ |
| किमान तापमान (अं.से.) | १८ | १८ | १९ | १८ | १८ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७४ | ७० | ७० | ६५ | ६० |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४४ | ३८ | ४० | ३८ | ३५ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | २ | २ | २ | २ | २ |
| वा-याची दिशा | ७७ | ११२ | १३५ | ४५ | ६८ |
| ढग स्थिती (आकाश) | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ |

| हवामानाचा इशारा | हवामान अंदाजानुसार दिनांक २८ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| सर्व रब्बी पिके | | कोरडवाहू रबी ज्वारी, करडई, सुर्यफुल व हरभरा पिकात डवरणी करून जमीन भुसभुशीत ठेवावे. |
| कपाशी | फुल पाती/ बोंड | अगोदर पेरणी केलेले कपाशी पिक वेचणीला आले आहे तरी कापूस वेचतांना प्रतवार व वाण प्रत वेचून त्याची सुकलेल्या सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावे.<br>कपाशी पिकातील बोंडसड व इतर बुरशीजन्य रोगाच्या नियंत्राणासाठी कार्बेन्डॅझिम ५० डब्लूपी प्रती २० ग्रॅम किंवा प्रोपिकॉनाझोल २५ ईसी १० मि.ली किंवा प्यराक्लोस्त्रोबीन २० डब्लूपि २० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कपाशीमधील आतील बोंडसड व इतर बुरशीजन्य रोगाच्या नियंत्राणासाठी कॉपर ऑक्सीक्लोरीड ५० डब्लूपि प्रती २५ ग्रॅम अधिक स्ट्रीपटोसायक्कलीन १-२ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>कपाशीची पाने लालसर झाल्यास २ किलो डीएपी + १ किलो मेग्नेसिअम सल्फेट किंवा १ किलो पोटाशियम नायट्रेट १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>पिकात शेंदरी बोंड अळीच्या नियमित सर्वेक्षण करून हेक्टरी ४ ते ५ फेरोमेन सापळे लावावी व वेळोवेळी त्यामधील ल्युर बदलावी व त्या सोबतच "टी" आकाराचे १० पक्षी थांबे प्रती एकर उभारावेत. ज्या वेळी ट्रेपमध्ये ८-१० प्रौढ पतंग सापडली त्या वेळी त्याच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा १५०० पीपीएम अझाडीरेक्टीन प्रती २५ मि.ली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>फुलावस्थेत दर आठवड्याने पिकामध्ये मजुराच्या साहाय्याने डोमकळ्या (गुलाबी बोन्ड अळी ग्रस्त फुले) शोधून नष्ट कराव्या. |

| | | |
|---|---|---|
| | | किडक्या बोन्डाची आर्थिक नुकसान पातळी ५ ते १०% असल्यास थायोडीकार्ब २५% डब्ल्यूपी २५ ग्रॅम किंवा क्विनॉलफॉस २५% एएफ २५ मिली किंवा क्लोरपायरीफॉस २५% प्रवाही २५ मिली किंवा प्रोफेनोफॉस ५०% ३० मिली किंवा इन्डोक्झाकार्ब १५.% १० मिली या पैकी कोणतेही एक कीटकनाशक १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>जेथे प्रादुर्भाव १० टक्केच्या वर आहे अशा ठिकाणी पुढील कोणत्याही एका मिश्र कीटकनाशकाची, ट्रायझोफॉस ३५% +डेल्टामेथ्रीन १ टक्के १७ मिली किंवा क्लोरान्ट्रोनिलीप्रोल ९.३ टक्के+लेम्बडासायहॅलोथ्रीन ४.५% ५ मिली किंवा क्लोरपायरीफॉस ५० टक्के +सायपरमेथ्रीन ५ टक्के २० मिली किंवा इन्डोक्झाकार्ब १४.५ टक्के + ॲसिटामाप्रिड ७.७ टक्के १० मिली या पैकी कोणतेही एक मिश्र कीटकनाशक १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>जेथे पान तुडतुडा चा प्रादुर्भाव नुकसान संकेत पातळी पेक्षा जास्त आहे तिथे इमिडाक्लोरीप्रीड १७.८ टक्के एसएल ३ मिली किंवा ॲसिटामाप्रिड २० टक्के एसपी प्रती ४० ग्रॅम या पैकी कोणतेही एक कीटकनाशक १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| सोयाबीन | परिपक्वता | सोयाबीन तयार झालेला माल सुरक्षित ठिकाणी ठेवावा. कापणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी ठेवावे. रिकामे झालेले शेत लगेच रबी पिकासाठी तयार करावे.<br>सोयाबीनची मळणी करताना दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १३-१५ टक्के असावे आणि मळणी यंत्राच्या ड्रमची गती ३५०-४०० फेरे प्रती मिनिट (आर.पी.एम.) या दरम्यान असावी जेणेकरून बियाण्याला इजा पोहोचणार नाही आणि उगवण शक्तीवर परिणाम होणार नाही. साठवणूक करताना बियाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १२ टक्के पेक्षा जास्त नसावे. |
| तूर | वाढ | तूर पिकात हेलीकोव्हरपा अळीच्या सर्वेक्षणासाठी ५ कामगंध सापळे प्रती हेक्टरी या प्रमाणे उभारावेत व त्यासोबतच पक्षी थांबे उभारावेत.<br>तूर पिकात गुंडाळलेली पाने व जाळे असलेली पाने काढून ती नष्ठ करावी. |
| रब्बी ज्वारी | पेरणी | खरीप ज्वारीचे पिक कापणीला आले असल्यास त्याची योग्यती काढणी व मळणी करून पिक सुरक्षित ठिकाणी ठेवावे.<br>बागायती रब्बी ज्वारीची पेरणी ३१ ऑक्टोबरर्पर्यंत करावी. रब्बी पिकामध्ये रब्बी ज्वारी या पिकाचा समावेश करावयचा असल्यास पिकेव्ही - क्रांती, या वाणांची निवड करावी. पिकामध्ये नत्र स्थिर करण्यासाठी, स्पुरद उपलब्ध होण्यासाठी व मातीतील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी अझोटोबाक्टेर व पीएसबी जीवाणुसंवर्धक २५ ग्रॅम व ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी.<br>बागायती रबी ज्वारीकरिता ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद, ४० किलो पालाश प्रती हेक्टरी द्यावे, यापैकी ४० किलो नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश पेरणीसोबतच द्यावे व उरलेली ४० किलो नत्राची मात्रा पीक २५ ते ३० दिवसाचे असतांना द्यावी. |
| करडी | पेरणी | ओलिताखालील करडईची पेरणी ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात पर्यंत करावी. उशिरात उशिरा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात करावी. त्याकरिता शिफारसकेल्या भीमा, एकेएस -२०७, पिकेव्ही - पिंक, किंवा नारी -६ या वाणची निवड करावी. पिकामध्ये नत्र स्थिर करण्यासाठी, स्पुरद उपलब्ध होण्यासाठी व मातीतील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी अझोटोबाक्टेर व पीएसबी जीवाणुसंवर्धक २० ग्रॅम व ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी. करडई पिकाचे धुऱ्याजवळील झाडावर मावा किडीचा प्रादुर्भाव दिसताच फक्त सभोवतालच्या ४ ओळीवर डायमीथोएट ३० टक्के प्रवाही १० मि.ली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| जवस | पेरणी | रब्बी पिकामध्ये जवस या पिकाचा समावेश करावयचा असल्यास ओलिताखालील जवस पिकाची पेरणी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत करावी. पिकामध्ये नत्र स्थिर करण्यासाठी, स्पुरद उपलब्ध होण्यासाठी व मातीतील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी अझोटोबाक्टेर व पीएसबी जीवाणुसंवर्धक २५ ग्रॅम व ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी. |

| | | |
|---|---|---|
| | | बागायती जवस पिकासाठी ६० किलो नत्र व ३० किलो स्फुरद प्रती हेक्टरी या प्रमाणे खताची संपूर्ण मात्र पेरणीच्या वेळेस द्यावी.<br>जवस पिकात आंतरपीक पद्धतीमध्ये जवस + हरभरा (४:२) किंवा जवस +करडई (४:२) याप्रमाणे आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे. |
| हरभरा | पेरणी | ओलिताखालील हरभऱ्याची पेरणी ऑक्टोबरच्या शेवटचा पंधरवडा ते १० नोव्हेंबर दरम्यान करावी. त्याकरिता वाण जाकी ९२१८, पीडीकेव्ही कांचन, विजय, विशाल, आयसीसीवि-२ , आयसीसीवि-१० यापैकी कोणताही वाणाची निवड करावी. मर प्रतिबंधक जातीमध्ये जाकी९२१८,विशाल, आयसीसीवि-२ , आयसीसीवि-१० या जातींचा समावेश होतो. पिकामध्ये नत्र स्थिर करण्यासाठी, स्पुरद उपलब्ध होण्यासाठी व मातीतील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी रायझोबीअम व पीएसबी जीवाणुसंवर्धक २५ ग्रॅम व ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी.<br>बागायती हरभरा पिकासाठी २५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद, ३० किलो पालाश प्रती हेक्टरी या प्रमाणे खताची संपूर्ण मात्र पेरणीच्या वेळेस द्यावी.<br>हरभरा पिकात हरभऱ्याच्या सहा ओळी आणि रबी ज्वारीच्या दोन ओळी याप्रमाणे आंतरपीक पद्धती फायदेशीर आहे. |
| फळझाडे | वाढ | संत्राच्या आंबिया बहराच्या पक्क झालेले फळांची योग्य पद्धतीने तोडून प्रतवारी करून विक्री करावी. फळाबागेतील आळे तण विरीहीत ठेवावे.<br>निंबू फळाबागेतील हस्त बहाराच्या नियोजनाच्यासाठी पॉटासीअम नायट्रेट २ टक्के वापरावे. सत्रापिकला त्याच्या वयानुसार शिफारस खत द्यावे. |
| पशु / जनावरे | - | पायखुरी व तोंडखुरी रोगाच्या संरक्षणासाठी पशुधन व दुग्ध जनावरांचे लसीकरण करावे.<br>वर्तविण्यात आलेल्या हवामान अंदाजानुसार किंवा स्थानिक वातावरणाचा अंदाज घेऊन कडकडाटनाऱ्या विजा व वादळीवाऱ्यापासून बचावासाठी पशु व जनावारांना संरक्षित ठिकाणी बांधावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय, मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.